IMPACT FACTOR 6.10

ISSN 2229-4406

*UGC Approved International Registered & Recognized Research Journal Related to Higher Education for all Subjects*

# UNIVERSAL RESEARCH ANALYSIS

UGC APPROVED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

Issue - XXV, Vol. IV
Year - XII (Half Yearly)
Sept. 2022 To Feb. 2023

**Editorial Office :**
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Contact :** 02382 -241913
9423346913 / 9503814000
9637935252 / 7276301000

**Website**
www.irasg.com

**E-mail :**
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
mbkamble2010@gmail.com

**Publisher :**
Jyotichandra Publication
Latur, Dist. Latur - 413531. (MS)

Price : ₹ 200/-

**CHIEF EDITOR**

Dr. Balaji G. Kamble
Professor & Head, Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya,
Latur, Dist. Latur(M.S.)India.

**EXECUTIVE EDITORS**

Dr. E. Siva Nagi Reddy
Director, National Institue of Hospitality & Tourism Management,
Hyderabad (A.P.)

Dr. D. Raja Reddy
Chairman, International Neuro Surjery Association,
Banjara Hill, Hayderabad (A.P.)

Dr. Rajendra R. Gavhale
Head, Dept. of Economics,
G. S. Mahavidyalaya,
Khamgaon, Dist. Buldhana

Dr. Nilam Chhangani
Head, Dept. of Economics,
SKNG Mahavidyalaya
Karanja Lad, Dist. Washim (M.S.)

Dr. Yu Takamine
Professor, Fafulty of Law & Letters,
University of Ryukyas,
Okinawa, (Japan).

Dr. A. H. Jamadar
Chairman, BOS Hindi,SRTMUN &
Head, Dept. of Hindi, BKD College,Chakur, Dist. Latur (M.S.)

Dr. Shaikh Moinoddin G.
Dept. of Commerce,
Lal Bahadur Shastri College,
Dharmabad, Dist. Nanded(M. S.)

Scott A. Venezia
Director, School of Business,
Ensenada Campus,
California, (U.S.A.)

**DEPUTY EDITOR**

Dr. N. G. Mali
Head, Dept. of Geography,
M. B. College,
Latur,Dist. Latur.(M.S.)

Dr. Babasaheb M. Gore
Principal,
Janvikas Mahavidyalaya,
Bansarola, Dist. Beed (M.S.)

**CO-EDITORS**

Dr. V.J. Vilegave
Head, Dept. of P.A.,
Shri. Guru Buddhiswami College,
Purna, Dist. Parbhani (M.S.)

Dr. Omshiva V. Ligade
Head, Dept. of History
Shivjagruti College, Nalegaon,
Dist. Latur. (M.S.)

Dr. S. B. Wadekar
Dept. of Dairy Science,
Adarsh College,
Hingoli, Dist. Hingoli.(M.S.)

Dr. Shivanand M. Giri
Dept. of Marathi,
Bhai Kishanrao Deshmukh College,
Chakur Dist. Latur.(M.S.)

DAYANAND COLLEGE OF ARTS LATUR

Director (IQAC)
Dayanand College of Arts
Latur. (M.S.)

PRINCIPAL
Dayanand College of Arts
Latur

Issue : XXV, Vol. IV
UNIVERSAL RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 6.10
ISSN 2229-4406
Sept. 2022 To Feb. 2023
URA

DAYANAND COLLEGE OF ARTS LATUR

# INDEX


| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 1 | The Effect of Skipping rope Exercise on Physicalfitness<br>**Anjali D. Barde** | 1 |
| 2 | Impact of Lethal and sub Lethal concentration of copper Sulphate on the behavour of Fresh water Fish, Macrones Cavasius<br>**M. S. Pentewar** | 6 |
| 3 | परसाई के व्यंग्य साहित्य में चेतना<br>**डॉ. विलास कांबळे** | 12 |
| 4 | शंकर पुणेतांवेकर की व्यंग्य-प्रधान रचनाओं में शैली तत्व: एक अध्ययन<br>**डॉ. व्यंकट पाटील** | 15 |
| 5 | पश्चिम विदर्भातील भाई समाजाची सामाजिक परिस्थिती<br>**डॉ. राजेंद्रकुमार रामराव गव्हाळे** | 19 |
| 6 | कुंडलसंगम पर्यटन क्षेत्राचा भौगोलिक अभ्यास<br>**डॉ. मनिषा पवार** | 27 |
| 7 | लोकतत्व : लोकसाहित्याचा पर्याय<br>**डॉ. पंडित जी. राठोड** | 33 |
| 8 | जी-२० आंतरराष्ट्रीय संघटनेत भारताची भूमिका : एक चिकित्सक अभ्यास<br>**डॉ. संतोष गुणवंतराव पाटील** | 38 |
| 9 | भारताचा राष्ट्रापती एक राजकीय अभ्यास<br>**गजानन ऐनवाड** | 44 |
| 10 | भारतातील स्त्रीयांचा बदलता सामाजिक दर्जा : एक अध्ययन<br>**डॉ. प्रदीप लक्ष्मणराव अंबोरे** | 54 |


Director (IQAC)
Dayanand College of Arts
Latur. (M.S.)

PRINCIPAL
Dayanand College of Arts
Latur

8

# जी-२० आंतरराष्ट्रीय संघटनेत भारताची भूमिका : एक चिकित्सक अभ्यास

डॉ. संतोष गुणवंतराव पाटील
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
दयानंद कला महाविद्यालय,
लातूर, जि. लातूर

Research Paper - Political Science

**प्रस्तावना:-**

दुसऱ्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय राजकारणात अनेक प्रादेशिक संघटनांचा जन्म झाला. प्रांतीय संघटनेच्या स्थापनेचा उद्देश आर्थिक आणि सामाजिक समस्या दूर करणे , प्रांतात सुरक्षित व्यवस्था निर्माण करणे आणि आपल्या प्रदेशाचा विकास करण्याचा आहे. संघटनेच्या माध्यमातून प्रांतांच्या हिताची पूर्तता करण्यासाठी स्वतंत्र आणि सार्वभौम राष्ट्र प्रयत्नशील असतात. यातूनच अनेक प्रादेशिक संघटना आंतरराष्ट्रीय राजकारणात अस्तित्वात आलेल्या आहेत. भूप्रदेश,संस्कृती, धर्म, समान आर्थिक हितसंबंध, संरक्षणाची समस्या यासारख्या अनेक घटकाच्या आधारावर आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत प्रादेशिक संघटना उदयास आलेल्या आहेत. सैनिकाच्या आधारावर नाटो, सिटो, सेंटो, वारसा करार करून संघटन मजबूत केल्याचे दिसून येते.

आशिया खंडात सार्क आणि आसियान या प्रमुख संघटना कार्यरत आहेत. आशियान व सार्क संघटनेमध्ये भारताने आतापर्यंत अतिशय प्रभावी भूमिका बजावलेली आहे. या संघटनेच्या माध्यमातून आशिया खंडातील राष्ट्राचा सामाजिक आर्थिक विकास झालेला दिसून येतो. संघटनेमध्ये समाविष्ट झालेल्या राष्ट्रांमध्ये एकात्मतेची भावना वाढते. परस्पर सहकार्य निर्माण होते.

औद्योगिक विकास करणे, आर्थिक समस्या दूर करणे व नवीन आंतरराष्ट्रीय व्यवस्थेची निर्मिती करण्यासाठी विकसित गैर- समाजवादी देशांनी G-७ नावाची एक संघटना ऊभी केली. त्यात अमेरिका, कॅनडा जर्मनी, ब्रिटन, फान्स, इटली व जपान या प्रमुख सात देशांचा समावेश होता. रशियाच्या विघटनानंतर रुसने १९९७ मध्ये G-७ या संघटनेचे सदस्यत्व स्वीकारणे तेव्हापासून त्याचे रूपांतर G-८ मध्ये झाले आहे. सहा ते आठ जुलै २००५ ला G-८ या प्रादेशिक संघटनेचे शिखर संमेलन स्कॉटलॅंड येथे संपन्न झाले. या शिखर संमेलनात भारतासह पाच विकसनशील देशांना आमंत्रित करण्यात आले होते. तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी चार जुलैला

G-८ च्या बैठकीमध्ये भाग घेतला. भारताशिवाय ब्राझील, चीन, मेक्सिको व दक्षिण कोरिया या देशांचा समावेश G-८ मध्ये करण्यात आला. G-७ देशांनी G - २० ची निर्मिती केली आहे. G - २० या जागतिक समुहामध्ये १९ देश व युरोपियन संघाचा समावेश आहे. त्यात अमेरिका, कॅनडा जर्मनी, ब्रिटन, फ्रान्स, इटली, जपान, अर्जेंटिना, ऑस्ट्रेलिया, ब्राझील, चीन, भारत, इंडोनेशिया, मेक्सिको, रुस, सौदी अरब, दक्षिण आफ्रिका, दक्षिण कोरिया, टर्की व युरोपियन संघ यांचा समावेश होतो. आर्थिक स्थैर्य निर्माण करून सदस्य राष्ट्राचा आर्थिक विकास करणे ,नवीन आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्था निर्माण करणे ,आर्थिक समस्येवर सामूहिकपणे चर्चा करणे, औद्योगिक विकास करणे, एकमेकांना आर्थिक विकासाच्या दृष्टीने सहकार्य करण्याच्या उद्देशाने आंतरराष्ट्रीय स्तरावर जी ट्वेंटी या संघटनेची निर्मिती १९९९ मध्ये करण्यात आलेली आहे. जागतिक सकल जीडीपीपैकी, ८५ टक्के वाटा जी-२० समूहातील देश उचलतात. जागतिक व्यापारात ७५ टक्के वाटा आहे.

भारत हा या संघटनेचा एक सदस्य आहे. G-२० चार सदस्य या नात्याने भारताने योग्य ती भूमिका बजावलेली आहे का? या संघटनेत काम करताना भारताला काही समस्येला सामोरे जावे लागले का ? G-२० मध्ये भारताचा प्रभाव आहे का? याचा अभ्यास करण्यात आला आहे. G-२० हा विषय केवळ राज्यशास्त्र या विषयाशी संबंधित नसून सामाजिक शास्त्रातील इतर अनेक विषयाशी संबंधित आहे. आर्थिक स्थिरता निर्माण करण्यासाठी G-२० या आंतरराष्ट्रीय संघटनेची निर्मिती करण्यात आली असल्यामुळे हा विषय अर्थशास्त्राशी संबंधित आहे. या संघटनेतील सदस्य देशांच्या भूप्रदेश, सीमा, हवामानाचा अभ्यास केला असल्यामुळे हा विषय भूगोलाशी संबंधित आहे. संरक्षणशास्त्र, इतिहास, लोकप्रशासन,समाजशास्त्र व तत्वज्ञान या सारख्या अनेक विद्याशाखेशी संबंधित आहे.

**संशोधनाचे गृहीत:-**

१) G-२० या आंतरराष्ट्रीय संघटनेमध्ये भारताची भूमिका महत्त्वाची आहे.

२) वर्तमान काळात आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताचा प्रभाव वाढला आहे.

३) G-२० या आंतरराष्ट्रीय संघटनेतील सदस्य देशात एकात्मता आहे.

४). G-२० या आंतरराष्ट्रीय संघटनेतील सदस्य देशात परस्पर सहकार्य आहे.

**संशोधनाचे महत्त्व:-**

G-२० ही आंतरराष्ट्रीय संघटना असल्यामुळे सदरील लघु संशोधन प्रकल्प आंतरराष्ट्रीय स्तरावर उपयुक्त आहे.अमेरिका, कॅनडा जर्मनी, ब्रिटन, फ्रान्स, इटली, जपान, अर्जेंटिना,ऑस्ट्रेलिया, ब्राझील, चीन, भारत, इंडोनेशिया, मेक्सिको, रुस, सौदी अरब, दक्षिण आफ्रिका, दक्षिण कोरिया, टर्की व युरोपियन संघ या देशातील आर्थिक, भौगोलिक, सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करण्यात

येणार आहे. जागतिकिकरण, उदारीकरण, खाजगीकरणाच्या युगात प्रत्येक देश औद्योगिक विकासाच्या दृष्टीने प्रयत्न करत आहे.

G-२० संघटनेचा भारत सदस्य असून २०२३ च्या अध्यक्ष पदाचा बहुमान भारताला मिळाला आहे त्यामुळे सदरील विषयावरील संशोधन राष्ट्रीय दृष्टीने उपयुक्त आहे.आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत सुरूवातीच्या काळापासून शांतता,अहस्तक्षेप, सहकार्य, नैतिकता या सारख्या आदर्श तत्वांचा स्वीकार केला असल्यामुळे आज आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताचा प्रभाव वाढला आहे. G-२० या आंतरराष्ट्रीय संघटनेमध्ये भारताची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे.

आंतरराष्ट्रीय राजकारणातील G-२० या संघटनेच्या लघु संशोधनामुळे आर्थिक विकासाला चालना मिळेल. सदस्य देश परस्परांना आर्थिक, औद्योगिक, सामाजिक मदत करतात की नाही हे यांची सर्वसामान्य अभ्यासकाला ही जाणीव होते.नवीन आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्थे समोर कोणकोणत्या समस्या आहेत त्या समस्या दूर करण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या पाहिजेत याची आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या तज्ञ अभ्यासकांना माहिती प्राप्त होते.

**संशोधनाचा उद्देश :-**

१) आंतरराष्ट्रीय संबंध व राजकारणाच्या अभ्यास करणे.

२) जी ट्वेंटी मध्ये भारताच्या भूमिकेचे अध्ययन करणे.

३) नवीन आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेची माहिती प्राप्त करणे.

४) जागतिक आर्थिक समस्येचा अभ्यास करून उपाय योजना सुचविणे.

५) आंतरराष्ट्रीय राजकारणातील प्रादेशिक संघटनांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धत:-**

संशोधन कार्यासाठी वर्णनात्मक व विश्लेशानात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. विश्लेषण करताना ग्रंथालयीन साहित्याचा, वर्तमानपत्राचा व निवडक महत्वपूर्ण लेखांचा वापर करण्यात येणार आहे. तथ्य संकलनासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा उपयोग केला जातो. प्राथमिक स्त्रोतामध्ये मुलाखती, प्रश्नावलि, अनुसूचि व निरीक्षण याद्वारे तथ्य संकलित करण्यात येणार आहे.तर दुय्यम स्त्रोतामध्ये शासनाद्वारे प्रकाशित अहवाल, संदर्भ ग्रंथ, संशोधनपत्रिका, संकेत स्थळ, वृत्तपत्र व मासिके यांचा आधार घेण्यात येणार आहे.

**संशोधनाची व्याप्ती :-**

प्रस्तुत संशोधनाचा विषय आंतरराष्ट्रीय स्वरूपाचा आहे. G-२० या आंतरराष्ट्रीय संघटनेमध्ये अमेरिका, कॅनडा जर्मनी, ब्रिटन, फान्स, इटली, जपान, अर्जेटिना, ऑस्ट्रेलिया, ब्राझील, चीन, भारत, इंडोनेशिया, मेक्सिको, रुस, सौदी अरब, दक्षिण आफिका, दक्षिण कोरिया, टर्की व युरोपियन संघ यांचा समावेश आहे. G-२० या आंतरराष्ट्रीय संघटनेतील सदस्य देशांनी प्रभावी

भूमिका बजावलेली आहे. सदरील संशोधनात सर्व सदस्य देशांच्या भूमिकेचा सविस्तर अभ्यास केला जाणार नाही. फक्त भारताच्या भूमिकेचा सविस्तर अभ्यास केला जाणार आहे.

**जी-२० भारताची भूमिका :-**

" वसुधैव कुटुंबकम" म्हणजेच एक पृथ्वी एक कुटुंब ही संकल्पना उपनिषदातून भारताने जी२० साठी घेतली आहे. मानव, प्राणी, वनस्पती आणि सूक्ष्मजीव यांच्यातील परस्परसंबधांचे महत्त्व या संकल्पनेतून अधोरेखित होते. या संकल्पनेतुन स्वच्छ, हरित व हरित विश्व निर्माण करणा?या जागतिक परिवर्तनकारक उपाययोजनांची निर्मिती होते. जी २० गटाच्या सामूहिक कार्याला प्रोत्साहन देण्यासाठी ,आपत्ती जोखीम कमी करण्यासाठी, आदान प्रदान करण्यासाठी आणि बहुशाखीय संशोधन करण्यासाठी भारताच्या अध्यक्षतेखाली एक नवीन कृती गट स्थापन करण्यात आला आहे. भारताचे विशेष आमंत्रित अतिथी देश म्हणून बांगलादेश, इजिप्त, मॉरिशस, नेदरलँड, नायजेरिया, ओमान, सिंगापूर, स्पेन आणि युएई यांचा स्वीकार केला आहे. संयुक्त राष्ट्र, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक, जागतिक आरोग्य संघटना, जागतिक व्यापार संघटना, आंतरराष्ट्रीय कामगार संघटना , एफएसबी, ओईसीडी, एयू चे अध्यक्ष, एनईपीएडी चे अध्यक्ष, आसियान अध्यक्ष, आशियाई विकास बँक, आंतरराष्ट्रीय सौर आघाडी आणि सीडीआरआय या आंतरराष्ट्रीय संघटना जी २० ने आमंत्रित केलेल्या आहेत. जी २० बैठका केवळ नवी दिल्ली पुरती मर्यादित राहणार नाहीत.भारतातील ५० हून अधिक शहरांमध्ये २०० हून अधिक बैठकांचे आयोजन करण्यात आले आहे . जी- २० सदस्य देशांना भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाची ओळख करून देण्याची संधी यानिमित्ताने मिळेल.

वाढत्या औद्योगिकारनामुळे जागतिक हवामान बदलाला मोठ्या प्रमानात सामोरे जात आहोत .त्यामुळे भारताच्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात हवामान बदल हा प्रमुख अजेंडयापैकी एक असेल, ज्यामध्ये हवामान वित्त आणि तंत्रज्ञानावरच लक्ष केंद्रित करून तर जगभरातील विकसनशील राष्ट्रांसाठी ऊर्जा संवर्धन करून अपारंपरिक ऊर्जा निर्मितीसाठी जागतिक पातळीवर प्रोत्साहन दिले जाणार आहे. उद्योग व पर्यावरण क्षेत्रांमध्ये हवामान बदलाची समस्या लक्षात घेऊन, भारताने जगासाठी पर्यावरणपूरक जीवनशैली अवगत करण्याचा संदेश दिला आहे. ही एक वर्तन आधारित चळवळ आहे जी आपल्या देशाच्या समृद्ध, प्राचीन परंपराच्या माध्यमातून इतर देशांना पर्यावरण पूरक वर्तन करायला प्रेरित करते.

भारताच्या G२० संकल्पनेशी: 'वसुधैव कुटुंबकम' किंवा 'एक पृथ्वी. एक कुटुंब' एक भविष्य संकल्पनेशी हे सुसंगत आहे. गतिमान, सर्वसमावेशक आणि लवचिक विकास हा प्रत्येक देशाच्या विकासाचा आधारस्तंभ आहे. आपल्या G२० अध्यक्षपदाच्या काळात, भारताने अशा क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे ज्यात संरचनात्मक परिवर्तन घडवून आणण्याची क्षमता

आहे. यामध्ये जागतिक व्यापारात कामगार अधिकारांना प्रोत्साहन देणे आणि कामगार कल्याण सुरक्षित करणे, जागतिक पातळीवर तंत्रज्ञानाचे व कौशल्यांचे आदान प्रदान करून सदस्य राष्ट्रांना मदत करणे आणि सदस्य राष्ट्राचा विकास करणे हे भारताचे उद्दिष्ट राहणार आहे.

भारताचे G२० अध्यक्षपद २०३० अजेंडाच्या महत्त्वपूर्ण टप्प्याच्या मध्यात आले आहे. भारताने कोविड-१९ चे हानिकारक प्रभाव लक्षात घेतले आणि कृती करण्याच्या सध्याच्या दशकाचे पुनर्प्राप्तीच्या दशकात रूपांतर केले. या दृष्टिकोनाशी सुसंगत राहत २०३० शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्याच्या दिशेने G२० गटाद्वारे प्रयत्नांची पराकाष्ठा करण्यावर भारत लक्ष केंद्रित करू इच्छितो. या द्वारे तंत्रज्ञानात्मक परिवर्तन आणि डिजिटल तंत्रज्ञान आणि सार्वजनिक पायाभूत सुविधा विकसित करून शाश्वत विकासाला गती देण्यासाठी भारत नेतृत्व करणार आहे. भारत तंत्रज्ञानाच्या मानवकेंद्री दृष्टिकोनावर विश्वास ठेवून डिजिटल सुविधा, आर्थिक विकास, कृषी आणि शिक्षण या विविध क्षेत्रांमध्ये तंत्रज्ञान-सक्षम विकास मध्ये ज्ञानाची देवाणघेवाण सुलभ करू शकतो.

G२० च्या अध्यक्षपद कार्यकाळात एकविसाव्या शतकात भारत बहुराष्ट्रीयवादासाठी प्राधान्य देईल. एक अशी आंतरराष्ट्रीय व्यवस्था असेल कि ज्यामध्ये सर्वसमावेशक न्याय, समानता आणि बहुध्रुवीय प्रतिनिधित्व असेल, हि व्यवस्था की एकविसाव्या शतकातील आव्हानांचा सामना करण्यास सक्षम असेल.महिला नेतृत्वाचा विकास करण्यासाठी भारत महिला सशक्तीकरण आणि प्रतिनिधित्व याचा सर्वसमावेशक दिशा देण्यासाठी भारत प्रयत्न्य करेल. भारताने अध्यक्षपद कार्यकाळाच्या कार्यक्रमाची सुरुवात विविध सांस्कृतिक उपक्रमांनी केली आहे. ज्यामध्ये विविध लोकसहभागाचे उपक्रम, G२० लोगो आणि रंगांसह भारतीय पुरातत्त्व विभागाच्या १०० स्मारकांवर रोषणाई,आणि नागालँडमधील हॉंबिल महोत्सवात G२० ची ओळख करून देण्यात येणार आहे. वर्षभर चालणाऱ्या विविध शासकीय कार्यक्रमांमध्ये, युवा उपक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम आणि G२० चे कार्यक्रम होणा?या संबंधित शहरांतील प्रेक्षणीय स्थळे, भारताची संस्कृती आणि जागतिक वारसा स्थळाना भेटी दिल्या जात आहेत.

G-२० या आंतरराष्ट्रीय संघटनेमध्ये भारताची भूमिका महत्त्वाची आहे. वर्तमान काळात आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताचा प्रभाव वाढला आहे."जी-२० अध्यक्षपदामुळे भारत वैश्विक एकत्वाची भावना निर्माण करेल. म्हणूनच भारताने, "एक पृथ्वी, एक कुटुंब, एक भविष्य' ही संकल्पना स्वीकारली आहे". G-२० या आंतरराष्ट्रीय संघटनेतील सदस्य देशात एकात्मता दिसून आली.G-२० या आंतरराष्ट्रीय संघटनेतील सदस्य देशात परस्पर सहकार्य करीत आहेत.

## संदर्भ सूची :-

१) शैलेंद्र देवळाणकर - आंतरराष्ट्रीय संबंध, सकाळ प्रकाशन, पुणे
२) पुष्पेश पंत - २१ वी शताब्दी मे आंतरराष्ट्रीय संबंध, Mc Grae Hill (India)
३) सुहास पळशीकर -लोकशाही जिंदावाद, समकालीन प्रकाशन, पुणे
४) प्रभात भसीन, आंतरराष्ट्रीय संघटन, प्रभात प्रकाशन
५) डॉ. बी एल फाडिया - आंतरराष्ट्रीय राजनीती - साहित्य भवन पुब्लिकेशन, आगरा
६) चंद्रशेखर सूद निरंजना बहुगुणा -आंतरराष्ट्रीय राजनीती - राधा पब्लिकेशन्स, नई दिल्ली
७) https://www.g२०.org/en/
८) https://pib.gov.in
९) https://economictimes.indiatimes.com/topic/g२०-summit-२०२३
१०) https://g२०.mygov.in/